# मुंबईमध्ये वीज दराबाबतची प्रतिक्रिया

२८ जून २०१०

रूपाली घाटे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(विजेच्या नीलप्रतीसाठी)

# महाराष्ट्र शासनाच्या ७ मे, २०१० रोजीच्या टिपणावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची प्रतिक्रिया

महाराष्ट्र शासनाने दिनांक ७ मे, २०१० रोजी टी.पी.सी, आर. इन्फ्रा व महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांना एक महत्त्वाचे माहितीपर टिपण पाठवले. या महत्त्वपूर्ण टिपणाबाबत आमच्या वतीने काही लक्षवेधी मुद्दे सादर करत आहोत. या केसबाबत (दाव्याबाबत / न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत) एक जबाबदार राजकीय पक्ष म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुढील सूचना देत आहे व आक्षेप नोंदवत आहे.

## सूचना व आक्षेप

**१. शासन पूर्णतः अपयशी**

टाटा पॉवर कंपनी आर. इन्फ्राचा वीजपुरवठा बंद करणार हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते, जगजाहीर होते. वीजपुरवठा बंद केल्यानंतर त्या विशिष्ट दिवशी/तारखेला (व पुढील काळातही) प्रचंड गोंधळ माजणार हेही कोणाही लहान मुलाला समजेल इतके स्पष्ट होते. पण आयोगाने व शासनाने वेळेत पावले उचलली नाहीत. हा शासनाचा व आयोगाचा मोठा पराभव आहे. आयोगानेही वेळीच परिस्थिती ओळखून स्वत:हून कृती केली नाही. संबंधित संस्थांच्या प्रस्तुतीकरणानंतर शासनाला व आयोगाला जाग आली.

**२. थकबाकीदारांवर कठोर कारवाईसाठी स्वतंत्र यंत्रणेची गरज**

दीर्घकालीन वीजखरेदी करारांवर स्वाक्षरी करा, वाजवी दरात वीज पुरवठा... इत्यादी अनेक निर्देश वीज नियामक आयोगाने आर. इन्फ्राला दिले आहेत. गेल्या अनेक वर्षांत या निर्देशांचे पालन करण्यात रिलायन्स वारंवार अपयशी ठरत आहे. त्यामुळेच 'ही परिस्थिती' उद्भवली आहे.

अ) दीर्घकालीन वीजखरेदी करार केले जातील यावर देखरेख ठेवण्यासाठी एका यंत्रणेची निर्मिती करणे आवश्यक आहे.

आ) वीज नियामक आयोगाच्या निर्देशांचे पालन होते आहे की नाही हे तपासण्याची जबाबदारी कोणाची? निर्देशांच्या अंमलबजावणीची जबाबदारी कोणाची; महाराष्ट्र शासनाची की, शासनातील उर्जा खात्याच्या सचिवांची, की नियामक आयोगाची? या प्रश्नांची उत्तरे त्वरीत मिळणे आवश्यक आहे, आणि याबाबतचे चित्र स्पष्ट होणे अत्यावश्यक आहे.

इ) आयोगाच्या कायदेशीर निर्देशांचे पालन न केल्यास संबंधितांकडून मोठा दंड वसूल करण्यात यावा आणि कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच प्रसंगी संबंधितांना शिक्षा करणारी (परवाना रद्द करण्याची शिक्षा किंवा ग्राहकांसाठीच्या वीजदरवाढीला मान्यता न देण्याची शिक्षा... इत्यादी) व्यवस्थाही अस्तित्वात असायला हवी. या नियंत्रणात्मक व्यवस्थेच्या दबावामुळे संबंधित कंपन्या निर्देशाचे पालन न करण्यास धजावणार नाहीत.

**३. संबंधित संस्थांवर अंकुश ठेवण्यात नियामक यंत्रणा अपयशी**

**अ)** वीज वाजवी, परवडण्यायोग्य दरामध्ये मिळवणे हे वितरण परवानाधारकाचे प्राथमिक काम आहे. वितरण परवानाधारकाने प्रथम स्वत:च्या वीजविषयक गरजा पूर्ण करणे सक्तीचे आहे. तसे न केल्यास संबंधित संस्थेला ग्राहकसंख्या वाढवण्याचीही परवानगी देण्यात येऊ नये. पण या ठिकाणी रिलायन्स केवळ पुरेशी वीज मिळवण्यातच अपयशी ठरली आहे असे नाही, तर रिलायन्सने योग्य वीजखरेदी करार केलेले नाहीत आणि ते ग्राहकसंख्याही वाढवत आहेत.

**आ)** मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे या शहराच्या कायदेशीर गरजेनुसार आवश्यक तेवढी वीज पुरवण्यासाठी प्रयत्न होणे अत्यावश्यक आहेत. या शहरातच निर्माण केलेली वीज प्राधान्याने शहरातच वापरायला हवी. खऱ्या अर्थाने स्पर्धात्मकतेचा अभाव व वीज बाजारा व्यवस्थेचे बदलते स्वरूप पाहता, तसेच सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक ६ मे २००९ च्या निर्णयाचा आदर करूनच हा निर्णय घ्यायला हवा. आर. इन्फ्रा व टाटा पावर या दोहोंनी निर्माण केलेली वीज ही प्राधान्याने मुंबईतच वापरायला हवी, आणि तीही वाजवी दरात. महाराष्ट्र शासनाला व वीज नियामक आयोगाला याबाबत कार्यवाही करण्यास उशीर झालेला आहे. शासन व आयोग दोहोंनीही आपापले कर्तव्य कार्यक्षमतेने बजावलेले नाही.

या अपयशांच्या कारणांचे परीक्षण व विश्लेषण व्हायलाच हवे. तसेच चुकांची पुनरुक्ती टाळण्यासाठी योग्य पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

**४. स्पर्धात्मकता आणण्याची गरज**

वीजेच्या व्यवहारामध्ये स्पर्धात्मकता आणण्याची गरज आहे, असे वीज कायदा- 2003चे कलम 61 सांगते. एकाच भागात वीजपुरवठा करणाऱ्या वितरकांमध्ये स्पर्धा असेल, तर वीज दर कमी होण्याची शक्यता आहे. तसेच यामुळे खुद्द वितरकांची कामगिरी सुधारेल; कार्यक्षमता वाढेल. पण हे प्रकरण (केस) स्पर्धेच्या तत्त्वाला आणि कायद्याच्या गाभ्यालाच मारक ठरणारे आहे.

अ) मुंबईमध्ये वेगळे भौगोलिक क्षेत्र असलेले ३ वितरण परवानाधारक आहेत. स्पर्धात्मकता आणून बाजारातील अकार्यक्षम घटकांचे उच्चाटन करण्याचा जरी नियामक आयोगाचा प्रयत्न असला तरी प्रत्यक्षात मात्र बाजारात काही मोजक्याच लोकांचा प्रभाव अधिक आहे (oligopolistic market). बाजारातील त्यांचा वाटा एकीकडे झुकलेला आहे (skewed market shares). जर रिलायन्स व टीपीसी हे दोघेही अयोग्य रितीने 'मार्केट शेअर'साठी स्पर्धा करत असतील, तर मात्र याठिकाणी नियंत्रणात्मक मंडळाने हस्तक्षेप करणे व अशा प्रयत्नांना पायबंद घालून ग्राहकहिताचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

आ) वीज उद्योगाच्या सातत्याने बदलणाऱ्या स्वरूपामुळे वीजेच्या खरेदी-विक्रीतील सुधारणा व वीजेची किंमत यांबाबत आजपर्यंत निश्चित व कायमस्वरूपी धोरण ठरलेले नाही. म्हणूनच शासनाने दीर्घकालीन धोरणात्मक विचार करून आवश्यकता भासल्यास वीज कायद्यातही बदल करावा.

**५. या प्रश्नाचा सर्वांगीण विचार आवश्यक**

मुंबईतील वितरण परवानाधारकांमध्ये अनेक मुद्यांवर संघर्ष होत आहेत. हे सर्व मुद्दे परस्परांत गुतलेले आहेत. प्रत्येक प्रकरण एकमेकांवर अवलंबून आहे. उदाहरणार्थ- सध्याची केस ही वीज पुरवठ्याशी संबंधित आहे. रिलायन्सची केस ही अवाजवी भांडवली (capex) व देखभाल-दुरूस्तीचा ( ) खर्च या बाबींशी संबंधित आहे (या संदर्भातील लेखा परीक्षण अहवाल येणे बाकी आहे).

ह्या दोन्ही प्रकरणांमुळे वीज दरवाढ होऊन ग्राहकांना यांचा फटका बसला आहे. यांचा स्वतंत्रपणे विचार करणे अयोग्य आहे.

**६. दीर्घकालीन तोडगा काढण्याची गरज:**

महाराष्ट्र शासनाने जे टिपण संबंधितांना दिले आहे, त्यात केवळ अल्पकालीन किंवा तात्पुरते उपाय सुचवलेले आहेत. ही तात्पुरती मलमपट्टी आहे. परंतु असे न करता शासनाने मुंबईकरांच्या अपेक्षा पूर्ण करत योग्य वेळी, योग्य कार्यवाही करणे गरजेचे आहे आणि अशी परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही याची ग्वाहीदेखील देणे अत्यावश्यक आहे.

**अनिल शिदोरे**
सरचिटणीस
महाराष्ट्र नवनिर्माण सेना